**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**
**सन २००७ - २००८.**

विषय क्रमांक- १ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक -१ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/४/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/४/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.स्थायी समितीने मंजूर केलेल्या पाईप खरेदी प्रकरणी म.न.पा.चे कायदे विषयक सल्लागार यांचे मत मागविले होते त्याचे काय झाले.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.चे कायदे विषयक सल्लागार यांना पत्र दिलेले आहे. पुढील सभे पर्यत त्यांचे सदर प्रकरणी मत घेण्यांत यावे.

मा.श्री.जोशी अ.सु. :-वकिलाचे मत पुढील सभेत ठेवणेत यावे. हा विषय वगळता मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/४/२००७ रोजीचे कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- कार्यवृत्त कायम करावे.

मा. श्री. बारस्कर पो. ज. व मा.श्री. घुले अ.ह. :- कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.सभापती साहेब :- मागिल सभा दिनांक ७/४/२००७ रोजी चे सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक ७/४/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.
अनुमोदक :- मा.श्री. घुले अ.ह.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- २**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक- २ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक -२ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाचे सेवेचे मा.प्रधान सचिव, नगर सचिव,नगर विकास विभाग मुंबई यांचे पत्रानुसार सक्षमीकरण करणे कामी तयार केलेल्या पदनिहाय कृती आराखडया नुसार अग्निशमन विभागा कडेस नविन पदे निर्माण करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** सादर,

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये रिपोर्ट देण्यांत येतो की, मा.नगर विकास विभाग यांनी २६ जून २००६ रोजी पत्र देवून राज्यातील अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेबाबत कळविलेले आहे व त्या पत्रामधील प्यारा नं.३ मध्ये महानगरपालिकेचे प्रस्ताव आयुक्त यांनी अग्निशमन सेवा विषयाबाबतचे पद निर्मिती / वेतनश्रेणी निश्चिती, त्याचप्रमाणे वेळोवेळी होणा-या आगीच्या दुर्घटणा अशा बाबतचे प्रस्ताव संचालक, अग्निशमन सल्लागार यांचेकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावेत जेणे करून सदर विषयास सुसुत्रीकरण आणने व वेळीच योग्य कार्यवाही करणे शक्य होईल असे सुचविलेले आहे.

आग, पुर व वादळ अशा नैसर्गिक अपत्तीपासून जिविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे करिता तात्काळ संकट काळातून लोकांना सोडविण्यासाठी प्रशिक्षित पथकाची गरज भागविण्यासाठी सन १९४८ साली अहमदनगर नगरपरिषद कार्यक्षेत्रात अग्निशमन विभागाची स्थापना करण्यात आली.

सन १९४८ ते आजतागायत तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेमध्ये अग्निशमन विभागाच्या आस्थापना सुचीवर खालील प्रमाणे मंजूर पदे आहेत. सदरची पदे ही त्यावेळेच्या लोक संख्येनुसार मंजुर करण्यात आलेली आहेत.

| अ.नं | पदनाम | संख्या |
|---|---|---|
| १ | फायर फायटर सुपरिटेन्डेट | १ |
| २ | फायर फायटर सुपरवायझर | १ |
| ३ | फायर फायटर ड्रायव्हर | २ |
| ४ | फायर फायटर बिगारी | १६ |

अहमदनगर महानगरपालिकेने कृती आराखडा (आकृती बंध) तयार केला असुन त्यामध्ये खालील पदांचा समोवश आहे.

| अ.नं | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| २ | अग्निशमन अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ३ | स्टेशन ऑफीसर | ३ | ४५००-७००० |
| ४ | वाहन चालक | १५ | ३०५०-४५९० |
| ५ | लिपीक | ३ | ३०५०-४५९० |
| ६ | फायरमन | ५५ | २७५०-४४०० |
| ७ | शिपाई | १ | २५५०-३२०० |

सध्या महानगरपालिकेत सुमारे १२ कर्मचा-यांनी मा.अग्निशमन सल्लागार, राज्य प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचेकडे फायरमन पदांस पुरक व पात्र समजले जाणारे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण यशस्वी रित्या पुर्ण केले आहे (तत्कालीन नगरपरिषदेच्या आस्थापना सुचीवर फायर फायटर बिगारी हे पद मंजुर आहे परंतु फायरमन हे पद मंजूर नाही वास्तविक अग्निशमन विभागाच्या आस्थापना सुचीवर फायरमन पद मंजुर असणे आवश्यक आहे.)

तरी देखील त्यांच्या पदनामामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नसुन त्यांना आज ही फायर फायटर बिगारी पदनाम आहे सदरचे पदनाम बदलून पदनामामध्ये फायरमन असे करणे गरजेचे व आवश्यक आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करता कर्मचा-यांच्या गुणाना वाव मिळावा त्या दृष्टीकोणातून त्यांच्या पदनामामध्ये बदल करणे व ज्या कर्मचा-यांनी फायरमन पदांस पुरक असे प्रशिक्षण पुर्ण केले आहे. त्यांना अग्निशमन विभागाच्या आस्थापना सुचीवर फायरमन पदावर नियुक्ती देणे आवश्यक असुन व जे कर्मचारी आजमितीस अग्निशमन विभागाकडेस कार्यरत आहेत परंतु त्यांनी सदरचे प्रशिक्षण पुर्ण केले नाही अशा कर्मचा-यांपैकी ज्याची किमान १०वर्ष सलग सेवा झालेली असुन जे शारिरीक दृष्टया सक्षम आहेत अशा कर्मचा-यांना फायरमन मदतनीस म्हणून नेमणूक देणे उचित वाटते.

अहमदनगर नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर होवून सुमारे १ लाख लोक संख्येची भर शहरात पडलेली आहे आजमितीस सन २००१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ३०७४५५ व क्षेत्रफळ ८५.१४ चौ.कि.मी. असुन दिवसोदिवस शहराचा विकास होत आहे. शहरातून एक राष्ट्रीय महामार्ग जात असुन व एकूण आठ राज्य मार्ग जात असुन त्यावरून दररोज हजारो केमिकल्स गॅसेस इत्यादीची वाहतूक चालू असते तसेच १९८० सालापासून नागापुर भागामध्ये औद्योगिक वसाहत नव्याने सुरू झालेली असुन तेथे मोठया प्रमाणावर कारखाने सुरू झालेले आहेत. एम.आय.डी.सी.मध्ये वेगळे अग्निशमन व्यवस्था करण्यांत आलेली नाही त्यामुळे सदरचा भाग महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या तेथील अपत्कालीन परिस्थीतीमध्ये स्टाफ सह घटनास्थळी जावून कार्यवाही करावी लागते तसेच नगर पुणे रोड लगत केडगांव इंडस्टीयल इस्टेट येथे देखील औद्योगिक वसाहत असुन तेथे देखील कारखान्याना सेवा पुरवावी लागते अशा परिस्थतीत अग्निशमन विभागाकडील मनुष्यबळ ३ लाख लोकसंख्येचा विचार करता खूप अत्यल्प आहे.

सध्या महानगरपालिकेकडे तीन फायर वाहने आहेत. अग्निशमन विभागाची शहर व सावेडी अशा दोन केंद्रामध्ये विभागणी झालेली असुन शहराच्या नव्याने विकसीत होत असलेल्या व हद्दीवाढीने नव्याने समाविष्ट झालेल्या केडगांवची लोकसंख्या सुमारे ६० ते ७० हजार असुन या उपनगराचा झपाटयाने विस्तार होत आहे. केडगांव येथे उप अग्निशमन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव यापुर्वीच प्रस्तावीत करण्यात आला होता मात्र त्यावर अद्याप विचार झालेला नाही.

नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रूपातंर झाल्यानंतर अग्निशमन विभागाकडील आकृतीबंध (आराखडा)बाबतची माहिती त्वरीत सादर करण्यात आली. कर्मचारी आकृतीबंध मा.स्थायी समितीकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे खालील जी पदे अग्निशमन विभागाकडे दर्शविलेली आहे अशा कर्मचा-यासाठी गटविमा योजना लागु करणे आवश्यक आहे. सदरहू गटविम्याचा सहभाग ही महानगरपालिका भरणेस तयार आहे. मुख्य अग्निशमन अधिका-यासाठी रूपये २ लाखाचा विमा (जी.आय.एस.) उपमुख्य अग्निशमन अधिकारी व इतर उर्वरीत कर्मचारी यांना रूपये दीड लाख ठेवण्यांत यावा व मा.शासना नुसार अग्निशमन सेवेतील कर्मचा-यांना अन्य फायदे व्यतिरीक्त गटविमा योजनेचे (ग्रुप इन्शुरन्स जी.आय.एस.) फायदे देणे योग्य होईल.

अग्निशमन सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने शहर हद्दीत तसेच मागणी प्रमाणे हद्दीबाहेर महानगरपालिका अग्निशमन दलातर्फे सेवा पुरविली जाते त्याच प्रमाणे महानगरपालिकेचा वाढता विस्तार पाहता औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षितता पुरविणेचे काम अग्निशमन दलातर्फे केले जाते या कामी अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचारी स्वतःच्या जीवाचा विचार न करता कर्तव्य पार पाडतात. आजमितीस अग्निशमन दालचा विस्तार व कार्य अधिक प्रभावणीपणे होण्यासाठी आस्थापना सुचीवर पद निर्मितीची गरज असुन केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्टॅण्डींग फायर ॲडव्हायझरी कौन्सीलने ठरवून दिलेले मार्गदर्शकेच्या आधारे तयार करणेत आलेल्या पदनिहाय कृती आराखडयानुसार अग्निशमन विभागाकडेस खालील प्रमाणे पदनामे (पदे) तयार करणेत आलेली आहेत. तसेच वेतनश्रेणी बाबत इतर महानगरपालिकेची वेतनश्रेणी मागावुन घेवुन महानगरपालिकेच्या आकृतीबंधामध्ये दर्शविलेली वेतनश्रेणी खालील प्रमाणे.

| अ.नं | पदनाम | पदसंख्या | इतर मनपाची वेतनश्रेणी | आकृतीबंधा नुसार दर्शविलेली वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ८०००-१३५०० | ८०००-१३५०० |
| २ | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ६५००-१०५०० | ६५००-१०५०० |
| ३ | स्थानक अधिकारी स्टेशन ऑफीसर | ३ | ५५००-९००० | ४५००-७००० |
| ४ | सब ऑफीसर (स्टॅण्डींग फायर ॲडव्हायझर नुसार) | ३ | ४०००-६००० | --- |
| ५ | लिडींग फायरमन (स्टॅण्डींग फायर ॲडव्हायझर नुसार) | १२ | ३२००-४९०० | --- |
| ६ | ड्रायव्हर ऑपरेटर | २० | ३०५०-४५९० | ३०५०-४५९० |
| ७ | फायरमन | ६६ | ३०५०-४५९० | २७५०-४४०० |
| ८ | फायरमन मदतनीस | २० | २७५०-४४०० | २५५०-३२०० |

अशा क्रमवारीनुसार अग्निशमन विभागाकडील पदावली कायम करणेत आलेली आहे. महानगरपालिका अग्निशमन विभागास खालीलप्रमाणे पदांची आवश्यकता आहे.(शहर,सावेडी व केडगांव उपकेंद्रासह)

| अ नं | पदनाम | आवश्यक पदसंख्या | वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ८०००-१३५०० | १.अ] मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी (विज्ञान शाखेतील पदवीधारकास प्राधान्य) आणि रास्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथुन विभागीय अधिका-याचा पाठयक्रम किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथुन बी.ई अग्निशमन सेवा ही परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी किंवा अग्निशमन अभियंता संस्था (भारत) या संस्थेची पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>ब] ज्याची लोकसंख्या ५ लाखा पेक्षा कमी नसेल अशा शहराच्या कोणत्याही अग्निशमन सेवेचा उपमुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून ३वर्ष सेवा केलेली असावी.<br>क] शासनाकडील योग्य अधिकारी प्रतिनियुक्तीवर ठेवुन. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | उपमुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ६५००-१०५०० | शासन मान्य विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथील स्थानक अधिकारी व प्रशिक्षण कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक<br>स्टेशनऑफीसर (फायर फायटर सुपरवायझर) संवर्गातील पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>जडवाहन परवाना आवश्यक |
| ३ | स्थानक अधिकारी (स्टेशन ऑफीसर) | २ | ५५००-९००० | शासन मान्य विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथील उपस्थानक अधिकारी व प्रशिक्षीत कोर्स उत्तीर्ण आवश्यक.<br>जडवाहन चालविण्याचा परवाना आवश्यक.<br>फायरमन किंवा अग्निशमन विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक एम.एस.सी.आय.टी. किंवा तत्सम प्रमाणपत्र (महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आवश्यक |
| ४ | सब ऑफीसर | ३ | ४०००-६००० | १. इयत्ता १२ वी पास<br>२. नागपुर येथील सब ऑफीसर कोर्स<br>३. अग्निशमन दलाकडील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>४. जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>५. शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे |
| ५ | लिडींग फायरमन | १२ | ३२००-४९०० | १.इयत्ता १० वी पास<br>२.कायम फायरमन म्हणून ७ वर्षाचा अनुभव<br>३.राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्स पास<br>४. जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>५. शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे<br>**खाते मधुन**<br>१. इयत्ता ७ वी पास<br>२. कायम फायरमन म्हणून ५ वर्षाचा अनुभव<br>३. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्स पास<br>४. शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | ड्रायव्हर ऑपरेटर | २० | ३०५०-४५९० | १.इयत्ता ७ वी पास<br>२. जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक<br>३.राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्स पास<br>४.शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे |
| ७ | फायरमन | ६६ | ३०५०-४५९० | १.इयत्ता १० वी पास<br>२. अग्निशमन विभागाकडील ५ वर्षाचा अनुभव<br>३.राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्स पास.<br>४.शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे<br>**खाते मधुन**<br>१.इयत्ता ७ वी पास<br>२. अग्निशमन विभागाकडील २ वर्षाचा अनुभव<br>३.राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथील प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्स पास<br>४.शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे |
| ८ | फायरमन मदतनीस | २० | २७५०-४४०० | **खाते मधुन**<br>१. इयत्ता ७ वी पास<br>२. अग्निशमन विभागाकडील १० वर्षाचा कामाचा अनुभव<br>३. शारीरीक पात्रता नियमाप्रमाणे |

तरी उपरोक्त परिस्थितीचा विचार करता अहमदनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाची वर नमुद केल्याप्रमाणे नविन पदे निर्माण करणे बाबत तसेच मा.संचालक तथा अग्निशमन सल्लागार मुंबई यांच्या पत्रानुसार प्रस्ताव त्यांना पाठविण्यांस मान्यता मिळावी.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त श्री. आर.ए.देशमुख यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब :-उक्त प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस तसेच हाच प्रस्ताव मा.संचालक तथा अग्निशमन सल्लागार मुंबई यांना पाठविणेसाठी कार्यवाही करणे हरकतीचे नाही. दि.२१/१/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेब :- अग्निशमन दलाचे कार्यअधिक प्रभावी पणे होण्यासाठी केंद्रीय गृहमंत्राल्याच्या स्टॅन्डीग फायर ॲडवायझरी कमेटी ने ठरवून दिलेल्या मार्गदर्शनकेच्या अधारे लोकसंख्ये नुसारअहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागा कडील स्टॅपिंग पॅटर्न तयार केलेला आहे.

मा. श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपले अहमदनगर महानगरपालिकेचे स्टॅपिंग पॅटर्नला देण्यात येणारे मंजूरीस अधिन राहून ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाचे सेवेचे मा.प्रधान सचिव,नगर सचिव,नगर विकास विभाग मुंबई यांचे पत्रानुसार सक्षमीकरण करणे कामी तयार केलेल्या कृती आराखडया नुसार अग्निशमन विभागा कडेस नविन पदे निर्माण करणेस मंजूरी देण्यात येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमा नुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा. श्री. तिवारी सु.र.

अनुमोदकः- मा.श्री. जोशी अ. सु .

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**
**सन २००६-२००७.**

विषय क्रमांक :- ३ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक :- ३ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील झोपडपट्ट्या मध्ये एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (I.H.S.D.P.) राबविणे कामी आर्किटेक्ट / कंन्सलटंन्ट नेमणे करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उरापेक्त विषय संदर्भाकींत विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, विषयात नमुद केल्या प्रमाणे महानगरपालिका हद्दीत एकूण २२ झोपडपट्टया असून त्यापैकी १७ घोषित व ५ अघोषित आहेत. दिनांक २६/७/२००६ रोजी मा.आयुक्त साहेब यांचे दालनात बैठक घेण्यांत आली त्यावेळी असे नमुद करण्यांत आले की, सुरूवातीस ५ झोपडपट्टयाचे काम हाती घ्यावे १] वैदूवाडी २] संजय नगर ३] सावेडी गांवठाण ४] सिध्दार्थ नगर ५] बुरूडगांव रोड इत्यादी तद्नंतर उर्वरीत झोपडपट्टया येतात.

उपरोक्त विषयांकित काम करणेसाठी दिनांक १५/२/२००७ च्या दैनिक लोकमत व सामना या वर्तमान पत्रात फेर जाहीर निविदा क्र.१ अन्वये प्रसिध्दी देउन दिनांक १५/२/२००७ ते दि.२६/२/२००७ अखेर निविदा (नमुद फी चे दर) सिलबंद पाकिटातून महानगरपालिका कार्यालयात देण्या बाबत मागविण्यात आल्या होत्या मुदतीत एकूण १२ सिलबंद निविदा (पाकिट) प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेले निविदा मा.उपायुक्त (सा) यांचे दालनात दि.२७/२/२००७ रोजी उघडण्यांत आल्या त्या वेळी आर्किटेक्ट मनोज जाधव, अशोक काळे, सरनाईक, दिलीप काळे व अरविंद लातुरे हे उपस्थीत होते त्या प्रमाणे उघडलेल्या निविदांचा फी च्या दराचा तुलणात्मक त्तक्ता खालील प्रमाणे

आर्किटेक्टने करावयाची कामे.

१. झोपडपट्टयांचे सर्वेक्षण करणे
२. आराखडे, नकाशे.
३. अंदाजपत्रके
४. संबंधीत शासकीय विभागाकडे संपूर्ण प्रस्ताव तयार करून त्यास तांत्रिक प्रशासकीय मंजूरी घेणे इत्यादी
५. कामावर तांत्रिक देखरेख ठेवणे.

| अ नं | आर्किटेक्ट यांचे नांव | फी | शेरा |
|---|---|---|---|
| १ | शेळके ॲन्ड साळुंके असो. अ.नगर | ३ % | १] नकाशे व अंदाज पत्रके तयार करणे १.००%<br>२] सुपर व्हिजन चार्जेस २.०० % + सर्व्हिस टॅक्स १२ % |
| २ | सदाशिव हडप ॲन्ड असो. देवळाली प्रवरा ता.राहुरी, अहमदनगर | १.८३% | - |
| ३ | पवन टेक्नो. कंन्सलटंन्ट, लातुर | ३.९०% | १] सर्व्हेक्षण करणे, नकाशे तयार करणे ०.५० %<br>२] सविस्तर नकाशे, प्रत्यक्ष कामाच्या नकाशासह डिझाईन, मोजमापे अंदाज पत्रकाच्या ४ प्रती सह २.०० %<br>३] कामावर देखरेख करणे १.४०% + सर्व्हिस टॅक्स व तर टॅक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | दिलीपजी काळे ॲन्ड असो. पुणे | ४% | - |
| ५ | अविष्कार ग्रुप, अहमदनगर | २.२५% | १] सर्व्हेक्षण करणे २] आराखडे नकाशे तयार करणे ३] अंदाजपत्रके तयार करणे ४] तांत्रिक मंजूरी घेणे इत्यादी करिता प्रतेंकी ०.५ % ब ५] कामावर देखरेख करणे ०.२५ % |
| ६ | अशोक काळे ॲन्ड असो. अ.नगर | १.४७% | --------------------- |
| ७ | तरे ॲन्ड असो. सातपुर, नाशिक | ०.९३% | + सर्व्हिस टॅक्स |
| ८ | किर्लोस्कर कंन्सलटंन्ट लि. पुणे | ४.७५% | + सर्व्हिस टॅक्स |
| ९ | मे. सरनाईक कंन्सलटंन्ट, अ.नगर | १.८० % | ------------------------------ |
| १० | लॅण्ड मार्क कंन्स्ट्रक्शन, राहुरी | ३.५% | -------------------------- |
| ११ | संजय वाघचौरे ॲन्ड असो. श्रीरामपूर | ३.७५% | ------------------------- |
| १२ | विशाल साळुंक ॲन्ड असो. श्रीरामपूर | २.२५% | १] सर्व्हेक्षण करणे २] आराखडे नकाशे तयार करणे ३] अंदाजपत्रके तयार करणे ४] प्रस्ताव शासकीय विभागाकडे सादर करणे ५] प्रशासकीय मंजूरी घेणे ६] तांत्रिक मंजूरी घेणे इत्यादी करिता प्रत्तेंकी-०.२५%ब कामावर तांत्रिक देखरेख करणे ०.७५ % |

वरील तुलणात्मक तक्ता पाहता प्राप्त १ ते १२ निविदा पैकी तरे ॲन्ड असो.सातपुर, नाशिक यांचे दर स्पर्धात्मक दृष्टया इतर निविदा पेक्षा सर्वात कमी म्हणजे ०.९३ %+ सर्व्हिस टॅक्स असे आहेत. तरी कमी दराच्या निविदा धारकाशी वाटाघाटी करणे योग्य वाटते तरी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे. दि.९/३/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :- Ncgociation करिता बोलावणेस हरकत नाही . दि.९/३/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- छाननी समिती समोर ठेवा.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- सर्वात कमी दराच्या निविदा धारकाशी दराबाबत दि.१४/३/०७ रोजी मा.उपायुक्त (सा) यांचे समोर वाटाघाटी केल्या ठेकेदाराने प्रकल्प किंमतीच्य ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या दरा मध्ये काम करण्यांस दि.१४/३/०७ रोजी लेखी संम्मती दिली आहे. निर्णयास्तव सादर दि. १४/३/०७

मा.उपायुक्त साहेब (सा) :- छाननी समिती समोर ठेवा. दि.१५/३/०७

सादर,

निविदा दर पत्रके छाननी समितीच्या दि. १५/३/०७ रोजी झालेल्या बैठकीत सदरचे काम श्री. तरे ॲन्ड असो. सातपुर, नाशिक यांना प्रकल्प किंमतीच्या ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या दराने देण्याबाबत समिती ने शिफारस केलेली आहे. मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल फेर सादर असे.

शहर अभियंता :- छाननी समितीच्या शिफारसी नुसार सदर काम श्री. तरे ॲन्ड असोसीएशन यांना प्रकल्प किंमतीच्या ०.७८ %+ सर्व्हिस टॅक्स या प्रमाणे देणे योग्य वाटते. दि. १६/३/०७

अं.लेखा परिक्षक :-निविदा दर छाननी समितीचे प्रस्ताव 'अ' प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.२०/३/०७

मा.उपायुक्त साहेब(सा) :-प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समिती समोर पाठविणेस हरकत नाही. दि.२०/३/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२०/३/०७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदरचा विषय तहकुब ठेवणेत यावा. सदर प्रकरणी माहिती घेणे आहे.

मा.सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेब :- शहर अभियंता श्री. मगर साहेब या प्रकरणी मंजूरी संदर्भात तातडी आहे का?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.:- होय सदर प्रकरणी ऐंशी टक्के अनुदान मिळणार असून योजना तातडीने राबविणे कामी मंजूरी आवश्यक आहे.त्या मुळे कामे लवकर होतील.

मा.श्री. तिवारी सु.र.:- घोषित व अद्योषित अशा झोपडपट्टयाची माहिती द्यावी त्या सर्वच झोपडपट्टया मध्ये ही योजना राबविणार का?

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी :- झोपडपट्टया मध्ये ही योजना राबविणे करीता जागा उपलभ्द होईल. त्या प्रमाणे सर्वच झोपड पट्टयामध्ये डेव्हलममेंटची कामे होतील मंजूरी मिळाले नंतर योजना राबविणेस चालना मिळाले.

मा.श्री. तिवारी सु.र. व मा.श्री. बोरूडे अ.व. :- हा विषय तहकुब ठेवावा.

मा.श्री. जोशी अ.सु.:- सदर प्रकरणी सविस्तर माहिती घेणे असलेने हा विषय पुढील सभे पर्यत तहकुब ठेवावा

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते सदरचा विषय पुढील सभे मध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दी मधील झोपडपट्टया मध्ये एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (I.H.S.D.P.) राबविणे कामी आर्किटेक्ट / कंन्सलटंन्ट नेमणे करीता मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट. पुढिल सभेमध्ये निर्णयासाठी घेणेत यावा.

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. जोशी अ.सु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक ४ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक ४ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालय ते हातमपुरा, बुरूडगल्ली, पंचपीर चावडी, म.न.पा. कार्यालय दो बोटी चीरा, कोर्ट गल्ली, चौपाटी कारंजा ते दिल्ली दरवाजा या रस्त्याचे नुतणीकरण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरा संबंधी मा.स्थायी समितीने घेतलेल्या निर्णया वरील ऑफीस रिपोर्ट फेर विचारार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** संदर्भ मा. स्थायी समिती ठराव क्रमांक-३ दिनांक ५/३/२००७

विनंती रिपोर्ट की, उपरोक्त कामाच्या प्रशासकीय मान्यते नुसार जाहीर निविदा मागविण्यांत आल्या होत्या दि.१३/११/२००६ रोजी सिलबंद निविदा प्राप्त झाल्या असून सदर निविदा दिनांक १३/११/२००६ रोजी फोडल्या असता त्या मध्ये खाली नमुद केल्या प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या

| अ.नं. | निविदा धारकाचे नावं | प्राप्त झालेले दर |
|---|---|---|
| १ | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर | ८.९९%जास्त |
| २ | मे.ए.सी. शेख,अहमदनगर | १७.३२% जास्त |

वरील तक्ता पाहता त्या मध्ये मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन ,अहमदनगर यांचे आलेले निविदा दरा पेक्षा ८.९९%जादाचे दर हे स्पर्शात्मक दृष्टया सर्वात लोएस्ट आलेले आहेत. सदर दरा बाबत मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन यांना दि.९/१/०७ रोजी वाटाघाटी साठी बोलविले असता सदर ठेकेदार हे निविदा रकमे पेक्षा ६.९९% पेक्षा जादा दराने काम करावयास तयार असल्याचे कळविले आहे.

सदरचे दर सुधारीत अंदाजपत्रका पेक्षा १.५२% जादा आहेत. दर योग्य असल्याने छाननी समिती कडून मंजूरी साठी शिफारस करण्यांत आली. त्यानुसार प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर केला असता मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.५/३/२००७ चे ठरावा नुसार कमी निविदा दराचे निविदा धारक यांचे कामाची क्वालीटी चांगली नसल्याने सदर कामाचे सेकंन्ड लोएस्ट निविदा धारक यांना निगोशिएशन साठी बोलावंण्यात यावे ते जर कमीचे निविदा दराने काम करणेस तयार असल्यास त्याप्रमाणे तसा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यांत यावा असा ठराव पारीत करण्यात आला.

तथापी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १७१ कलम ५ नुसार कोणत्याही परिस्थीतीत उच्च दर उदघृत करणा-या निविदाधारकास कमी दर स्विकारण्यांस सांगता येणार नाही. त्या मुळे सदरचा ठराव बेकायदेशिर असल्याने ठराव विखंडीत करणे योग्य वाटते आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. व्ही.जी. सोनटक्के यांचा अहवाल असे. दि.३०/३/०७

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी :- मा.स्थायी समिती ठराव नं.३ दि.५/३/२००७ हा महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम १७१ कलम ५ नुसार योग्य वाटत नाही. त्यामुळे सदरचा ठराव विखंडीत करणे योग्य वाटते निर्णयास्तव सादर. दि.३०/३/०७

अंतर्गत लेखा परिक्षक :- प्रस्ताव 'अ' प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.३०/३/०७

मा.उपायुक्त साहेब (सा):-उक्त अहवाल पाहता अधिनियमातील व नियमातील तरतूदीशी विसंगत ठराव विखंडीत करणेसाठी पाठविणे उचित राहिल तसेच **उक्त निविदा फेर विचारार्थ स्थायी समिती कडे पाठविणे उचित राहिल** वांरवार अयोग्य निर्णय घेण्याची स्थायी समितीची सध्यपरिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणणे उचित राहिल आदेशार्थ सादर. दि.३०/३/०७

मा.आयुक्त साहेब :- As Per 'A'

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर,

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- कमीचे दर मंजूर करावे.

मा. श्री. बारस्कर पो.ज. व मा.श्री. तिवारी सु.र.:- कमीचे दर मंजूर.

मा.सभापती साहेब :- कमीचे दर सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी कार्यालय ते हातमपुरा, बुरूडगल्ली, पंचपीर चावडी, म.न.पा. कार्यालय दो बोटी चीरा, कोर्ट गल्ली, चौपाटी कांरजा ते दिल्ली दरवाजा या रस्त्याचे नुतणी करण करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दर धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन अहमदनगर यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निविदा रकमे पेक्षा सहा पूर्णाक नव्याण्णव टक्के जादा चे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो. ज.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक ५ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक ५ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठीरोड ते यश पॅलेस पर्यंत ४५० एम.एम.व ३०० एम.एम.आर.सी.सी.पाईप [Np-३ क्लास] ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दरासंबंधी मा.स्थायी समितीने घेतलेल्या निर्णया वरील ऑफीस रिपोर्ट फेर विचारार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** संदर्भ-मा.स्थायी समिती ठराव नं. २ दि.५/३/२००७.

मा.सादर,

विनंती रिपोर्ट की, उपरोक्त ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेचे काम विशेष निधीतून करणेस मा.सर्व साधारण सभा ठ.नं.३ दि.७/७/२००६ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली, त्यानुसार सदर कामास तांत्रिक मान्यता घेण्यात येवुन सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या.आलेल्या सिलबंद निविदा दि.२७/११/२००६ रोजी उघडले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | निविदा धारकांचे नांव | अंदाजपत्रका पेक्षा जादा/ कमी |
|---|---|---|
| १ | श्री. ए.एस.पांडूळे, अ.नगर | ३२% जादा |
| २ | दत्त स्टील इले. अ.नगर | ३४.५० %जादा |
| ३ | श्री.सुनिल राउत | २९.२२ %जादा |
| ४ | मे.कुदळे / झिरपे कं. | ३२ %जादा |

प्राप्त निविदेपैकी क्र.३ ची श्री. सुनिल राउत यांची निविदेतील दर निविदा दरापेक्षा २९.२२ %जादा हे प्राप्त निविदापेक्षा सर्वात कमी आहेत. सदर दराबाबत श्री. सुनिल राउत यांना दि.९/१/२००७ रोजी वाटाघाटीसाठी बोलाविले असता त्यांनी निविदेपेक्षा २१ % जादा दराने सदर काम करणेस तयार असल्याचे पत्र दिले आहे.

निविदाधारकाने वाटाघाटी नंतर नमुद केलेले २१ % जादा दर व सन २००६-२००७ चे दरसुची नुसार अंदाजपत्रकीय दराची तुलना केली असता सदरचे दर हे १.९६%जादा असल्याचे दिसुन येत आहे. त्यानुसार निविदा धारकाने वाटाघाटीनंतर नमुद केलेले २१ % जादा दर हे वाजवी असल्याने सदरचा रिपोर्ट मा.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव पाठविण्यात आला.

सदर प्रस्ताव दि.५/३/२००७ चे मा.स्थायी समितीमध्ये ठेवला असता मा.स्थायी समिती ठ.नं.२ नुसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठीरोड ते यश पॅलेस पर्यंत ४५०व ३०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी.पाईप [Np-३] ड्रेनेज लाईन टाकणेकामी मागविण्यात आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट तसेच सदर कामाची निविदा दाखल करणारे ठेकेदार श्री.एस.ए.पांडूळे यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय रकमेपक्षा वीस टक्के जादा दराने करणेस तयार असले बाबत आज दि.५/३/२००७ रोजी दिलेल्या पत्रावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

महानगरपालिकेचे आर्थिक हिताचे दृष्टीने निविदाधारक श्री. एस.ए.पांडुळे हे सदरचे काम अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा वीस टक्के जादाचे दराने करणेस तयार असलेने त्या बाबत त्यांनी तसे पत्र दिलेले असलेने त्यांचे कमीचे दरास मंजुरी देण्यात येत आहे.

या प्रमाणे ठराव पारीत करणेत आला आहे.

तथापि महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहीता १९७१ चे नियम १७१ कलम ५ नुसार कोणत्याही परिस्थितीत उच्च दर उदधृत करणा-या निविदाधारकास कमी दर स्विकारण्यास सांगता येणार नाही, त्यामुळे सदरचा ठराव बे्कायदेशीर असल्याने ठराव विखंडीत करणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी :-अहवालाप्रमाणे मा.स्थायी समिती ठ.नं.२ दि.५/३/२००७ हा महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १७१ कलम ५ नुसार योग्य वाटत नाही. त्यामुळे सदरचा ठराव विखंडीत करणे योग्य वाटते निर्णयास्तव सादर. दि.३०/३/२००७.

अंतर्गत लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.३०/३/०७

मा.उपायुक्त साहेब(सा):- उक्त अहवाल पाहता नियमांशी विसंगत असल्याने विखंडीत करणेसाठी शासनास पाठविणे आवश्यक वाटते. उक्त निविदा फेरविचारार्थ मा.स्थायी समिती कडे पाठविणे उचित राहील वांरवार नियम मोडून निर्णय घेण्याची स्थायी समितीची पध्दत शासनाच्या निदर्शनास आणावी लागेल आदेशार्थ सादर. दि.३०/३/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दिनांक ३/४/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर कामी मागविण्यांत आलेले निविदा मधील कमीचे दरास मंजूरी द्यावी.

मा.सौ. भागानगरे म.प्र. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- सदर कामी आलेले कमीचे निविदा दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठीरोड ते यश पॅलेस पर्यंत ४५० एम.एम.व ३०० एम.एम.आर.सी.सी.पाईप [Np-३ क्लास] ड्रेनेज लाईन टाकणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदा दरधारक श्री. सुनिल राउत यांनी निगोशिएशन नंतर कमी करून दिलेल्या निविदा रकमे पेक्षा एकवीस टक्के जादाचे निविदा दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. भागानगरे म.प्र.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक - २**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक ६ सोमवार दिनांक २३/४/२००७

ठराव क्रमांक ६ सोमवार दिनांक २३/४/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण खाजगी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण खाजगी तत्वावर राबविण्यास देणे कामी दैनिक सार्वमत, दैनिक लोकयुग, या वर्तमान पत्रातुन जाहीर टेंडर नोटीस प्रसीध्द केल्यानुसार दि.२०/२/०७ ते दि. १२/३/०७ या कालावधीत एकूण ६ टेंडर फॉर्मची विक्री झालेली आहे.

तत्पुर्वी दि.९/३/०७ रोजी निविदा पुर्व बैठक (Pre-bid meeting) मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात घेण्यात आली. सदर मिटींगमध्ये म.न.पा.ने दिलेल्या अटी - शर्ती प्रमाणे चर्चा होवून निविदा सादर करणे बाबत सुचना केल्या.

त्यानुसार दिनांक १३/३/०७ पर्यत मुदतीत टेंडर बयाना रक्कमेसह एकूण ६ निविदाधारकांच्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्याप्रमाणे त्याच दिवशी दुपारी ५.०० वाजता मा. उपायुक्त (कर) यांचे समोर व अंतर्गत लेखापरिक्षक व निविदाधारकांच्या उपस्थितीत उघडण्यात आल्या. उघडण्यात आलेल्या निविदाचा तुलणात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता मे. अंबादास नरसाळे, नालेगांव, अ.नगर यांचा रू.३५५/- सेवाकर वेगळा असा नमुद केलेला आहे.

तरी तुलणात्मक तक्ता पहाता मे.अंबादास नरसाळे,नालेगांव,अ.नगर.याचा दर रू.३५५/-+ सेवाकर १२.५%प्रमाणे रू.४४.४०=३९९.४०/-(प्रति श्वान)फक्त हा स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी आहे.

तरी सदर टेंडर दरास मंजुरीस्त व उर्वरित निविदाधारक यांची भरून घेण्यात आलेली बयाणा रक्कम परत करण्यास मंजुरी मिळणेस विनंती

अंदाज पत्रकीय तरतूद -२००७-०८

उनाड कुत्री बंदोबस्त करणे -रू.४,००,०००/-

येणे प्रमाणे मुख्य स्वच्छता निरिक्षक, वैद्यकिय आरोग्याधिकारी यांचा अहवाल असे .

अंतर्गत लेखापरिक्षक :- निविदा छाननी समिती निर्णया प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त साहेब (कर):- प्रस्ताव मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य राहील.

मा.आयुक्त साहेब :- इतर कार्पोरेशन मध्ये किती दर आहेत सादर करा. दि. २८/३/०७

फेर सादर,

मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण खाजगी तत्वावर राबविणेस देणेबाबत प्राप्त झालेल्या एकुण ६ निविदा धारकांच्या निविदादराचा तुलणात्मक तक्त्यानुसार मे. अंबादास नरसाळे, नालेगांव, अ.नगर यांचा निविदादर रू.३५५/- + सेवाकर १२.५ % प्रमाणे रू.४४.४०/- असा एकुण रू.३९९.४०/- स्पर्धात्मक दृष्टया तुलणात्मक तक्ता पहाता कमी असल्याने त्याबाबत मा.छाननी समिती पुढे सदर दरास मंजुरीबाबत शिफारस करण्यात आलेली असुन त्यानुसार मंजूरी व मान्यातेस्तव सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावाबाबत आपण दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे खालील प्रमाणे म.न.पा.शी दूरध्वनी वरून संपर्क साधण्यात आलेला असुन त्यांचे कडून प्राप्त झालेली माहिती पुढील प्रमाणे

**१] ठाणे म.न.पा.:-** सध्या नर व मादी जातीचे प्रती श्वान मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरणासाठी रू.२०००/- खर्च म.न.पा.स्वत : करत आहे. यामध्ये कर्मचारी, जागा ,वैद्यकीय अधिकारी, वाहन व्यवस्था, म.न.पा. कडे उपलब्ध आहे.

**२] पुणे म.न.पा:-**पुणे म.न.पा.त ठेकेदारी पध्दतीवर उपक्रम राबविला जात आहे.यामध्ये निर्बिजीकरणासाठी प्रती श्वान रू.४००/-खर्च आहे. परंतु म.न.पा.कडून कुत्रे पकडून व वाहन वापरूण ठेकेदाराला त्याने नमुद केलेल्या ठिकाणी कुत्र्याची ने आण करणे ही सदरची कामे म.न.पा.कडून केली जातात.

**३] पिंपरी चिंचवड म.न.पा. :-** पिंपरी चिंचवड म.न.पा येथील डॉ. श्री. सतिष गोरे यांच्याशी संपर्क साधला असता सपर्क होउ शकला नाही.

**४] औरंगाबाद म.न.पा. :-** औरंगाबाद म.न.पात. ठेकेदारी पध्दतीवर उपक्रम राबविला जात आहे. यामध्ये निर्बिजी करणासाठी प्रती श्वान रू.६००/- खर्च आहे. पंरतु म.न.पा. कडून कुत्रे पकडुन व वाहन वापरूण ठेकेदाराला त्याने नमुद केलेल्या ठिकाणी कुत्र्याची ने आण करणे ही सदरची कामे म.न.पा. कडून केली जातात.

येणे प्रमाणे मुख्य स्वच्छता निरिक्षक, वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचा अहवाल फेर सादर असे.

मा.उपायुक्त साहेब (कर) :-उपरोक्त प्रमाणे इतर मनपामधील कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाचा खर्च पहाता प्राप्त दर वाजवी दिसून येतात. सबब प्रस्ताव मंजूरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य राहील. दिनांक.५/४/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.७/४/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. व मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर.

मा.श्री. तिवारी सु.र. :- कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण खाजगी तत्वावर राबविणेस देणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता मे.अंबादास नरसाळे नालेगांव अहमदनगर यांचा स्पर्धात्मक दृष्टया प्रतीश्वान रूपये तीनशे पंचावन्न अधिक सेवाकर या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी

सुचक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**विषय :-** अ.नगर महानगरपालिका, कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे खाजगी तत्वावर राबविणेस देणेबाबत मागविण्यांत आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता.

निविदा प्रसिध्दी- दैनिक सार्वमत दि.१८/२/०७ निविदा फॉर्म विक्री- दि.२०/२/०७ ते १२/३/०७
दैनिक लोकयुग दि.२०/२/०७ निविदा स्विकारणे- दि.१३/३/०७ दु.४.०० वा.

| अन | कामाचा तपशील | मे.भालसिंग राजेंद्र गणपतराव, भिसतबाग रोड,अ.नगर | मे.दि.रॉयल व्हेटरनरी अन्स सोसायटी ऑफ इंडिया, नागपुर | मे. अंबादास शिवराम नरसाळे, गाडगीळ पटांगण, नालेगांव, अ.नगर | मे.डॉ.संतोष सिताराम गायकवाड, माणिकनगर ,नगरपुणे रोड, अ.नगर | मे.ॲनीमल प्रोटेक्शन क्लब, कराड, जि. सातारा | मे.महाराष्ट्र स्टेट को.ऑफ ॲग्री ॲण्ड व्हेटरनरी टेक्नीकल सर्व्हिसेस पुणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | महानगर पालिक कार्यक्षेत्रा तील मोकाटव भटकी कुत्री यांचा बंदोबस्त करणेकामी खाजगी तत्वार मोकाट व भटकी कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे. | निविदा दर रू. प्रति श्वान ८७५/- मात्र ॲटी रेबीज लस आम्ही आमचे स्वत: चे खर्चाने देणार आहोत त्याचा रू.१००/- वजा जाता एकुण रू.७७५/- | निविदा दर रू प्रति श्वान ७४०/- कुत्र्यांना पकडणे शस्त्रक्रिया करणे व पकडण्यासह आलेल्या ठिकाणी नेवुन सोडणे (१०,००० कुत्र्याच्या शस्त्रक्रिये सह) | निविदा दर रू.प्रति श्वान ३५५/- सेवाकर वेगळा | निविदा दर रू प्रति श्वान ५९९/- विना अट | निविदा दर रू प्रति श्वान ५७५/- - २५/-<br>५५०/- | निविदा दर रू प्रति श्वान ६२५/- lncrease of १५% per annum ln tender rate requested | |

सही/-
वैद्यकीय आरोग्य अधिक्षक
अहमदनगर महानगरपालिका

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.